|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव १४ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतीदिना निमित्य विभागात भारतातील महिलाचे शिक्षण आणि सदस्थिती या विषयावर एक दिवशीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी शिक्षणशास्त्र विभागातील विद्यार्थी प्यारसिंग पावरा, वैशाली पावरा आणि वहिदा गावित यांनी स्त्री भृण हत्या, बेटीबचाव बेटी पढाओ आणि भारतातील महान महिला या विषयावर भित्तीपत्रक तयार केले. तसेच भारतातील महिलांचे शिक्षण : सद्यस्थितीवर एम.एड. च्या विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण, व्हिडीओ, लेख वाचन, संशोधन पेपर वाचन, महिला विषयावरील काव्यवाचन केले. जयपाल नायकाडा, शादमा खान, ज्ञानेश्वर पाटील, योगेश करंदीकर, भैयासाहेब देवरे, संदीप वाघ, मिलींद तायडे, मुरलीधर झाल्टे, पावरा वैशाली या विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

वंदना बडगे , रवींद्र बस्सी, सरोजनी लभाणे, भंगलाल राठोड यांनी यावेळी मनोगते व्यक्त केली. डॉ. संतोष खिराडे यांनी जागतिक स्तरावरील मागील दशकातील महिलाचा प्रवास या विषयावर सादरीकरण केले. सीमा बारी यांनी काव्यात्मक पद्धतीने आधुनिक महिलांच्या प्रश्नांचे विश्लेषण केले. शिक्षणशास्त्र विभाग डॉ. मनिषा इंदाणी यांनी आधुनिक महिला आणि तिच्यावरील विविध जबाबदारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री शिगाडे व प्यारसिंग पावरा यांनी तर आभार मुरलीधर झाल्टे यांनी मानले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. १४ मार्च, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी